--

गोवा सरकार

माहिती आणि प्रसिध्दी खाते

पणजी-गोवा

वार्तापत्र

## 15 ऑगस्ट रोजी रोडरेसचे आयोजन

ता. 09 ऑगस्ट 2019

18 श्रावण 1941

क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाने गोवा अॅथलेटिक अॅसोसियेशनच्या सहकार्याने स्वातंत्र्यदिनी धाव स्पर्धेचे आयोजन केले आहे.

ही स्पर्धा 14 ते 16, 17 ते 19 आणि 20 वर्षावरील मुले आणि मुलींसाठी खुली आहे. 14 ते 16 वर्षावरील मुले आणि मुली 15 ऑगस्ट रोजी किंवा त्यानंतर, 17 ते 19 वर्षावरील 15 ऑगस्ट रोजी किंवा त्यानंतर आणि 20 वर्षावरील मुले आणि मुली 15 ऑगस्ट 1999 किंवा त्यानंतर जन्मलेली असावी. 14 ते 16 वयोगटातील मुलांसाठी जुने  सचिवालय ते धेंपो हाऊस आणि परत, 17 ते 19 वर्षावरील मुलांसाठी जुने सचिवालय ते कला अकादमी आणि परत  आणि 20 वर्षावरील मुलांसाठी जुने सचिवालय ते बालभवन आणि परत असा धाव स्पर्धेचा मार्ग आहे.

शाळा, उच्च माध्यमिक शाळा आणि महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशिका संबंधित शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखामार्फत तर इतर स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका आपल्या मालकांमार्फत किंवा स्वता जन्म दाखल्यासह सादर कराव्या.

प्रवेशिका 13 ऑगस्ट संध्या 5 वाजेपर्यंत क्रीडा आणि युवा व्यवहार खात्याच्या कार्यालयात सादर कराव्या.

मा/वाप/एमएस/जॉआ/रना/प्रधु/2019/451

DIRECTORATE OF INFORMATION AND PUBLICITY.
THIRD FLOOR,UDYOG BHAVAN,
NEAR AZAD MAIDAN, PANAJI GOA